# आरोग्याची सर्वतोपरी काळजी घेणारी 'सेहत'

**प्रत्येक महिलेमध्ये कर्तृत्व गाजविण्याची असामान्य ताकद असते, क्षमता असते. कधी या क्षमतेला थोडा पाठिंबा लागतो. कधी संकटकाळी आधार लागतो. कधी त्यासाठी केवळ मार्गदर्शनाची गरज असते. विविध समस्यांशी झुंजणाऱ्या विविध वर्गातील महिलांसाठी कार्यरत असलेल्या मुंबई आणि परिसरातील काही संस्थांची माहिती नवरात्रीच्या निमित्ताने आजपासून नऊ दिवसांमध्ये.**

आधारस्तंभ

फोटो : प्रातिनिधिक



म. टा. विशेष प्रतिनिधी

**मुंबई** : सर्वसामान्यपणे कुठल्याही घरामध्ये गर्भवती स्त्रीभोवती असलेले वातावरण प्रसन्न राहण्यासाठी घरातील व्यक्तीही प्रयत्नशील असतात. मात्र या सर्वसामान्य चौकटीपलीकडे खूप वेगळे जगही असते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार गेल्या काही वर्षांमध्ये गर्भवती महिलांबाबत होणाऱ्या कौटुंबिक हिंसेचे प्रमाण वाढत आहे. भारतीय लोकसंख्येच्या ७ ते ८ टक्के महिलांच्या बाबतीत अशा प्रकारे हिंसा होते. गर्भारपणाच्या काळामध्ये या महिलांच्या शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्यासाठीही काळजी घेणारी मुंबईतील 'सेहत' ही संस्था. ही संस्था सन १९९४ पासून कार्यरत आहे. प्रत्यक्ष रुग्णालयातील कामासोबतच संशोधनाचेही महत्त्वपूर्ण काम या संस्थेच्या माध्यमातून होत आहे.

आरोग्य हा मानवी अधिकार आहे, या गृहितकावर आधारित 'सेहत'चे काम चालते. 'सेहत - सेंटर फॉर एन्क्वायरी इन्टू हेल्थ अँड अलाइड थीम्स' असे या संस्थेचे पूर्ण नाव असून आरोग्य क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण, सेवा आणि प्रचार-पुरस्कार आदी क्षेत्रांमध्ये 'सेहत'चे काम चालते. ज्या समाजघटकांना संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत नाहीत, त्यांच्यासाठी प्रामुख्याने 'सेहत'च्या माध्यमातून मदत करण्यात येते. हिंसा आणि आरोग्य, लिंग आणि आरोग्य, आरोग्य क्षेत्रावर नियंत्रण, आरोग्य सेवा आणि वित्तपुरवठा या चार विभागांमध्ये 'सेहत' कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून प्रामुख्याने झालेले काम म्हणजे, गर्भारपणाच्या काळामध्ये रुग्णालयामध्ये या महिलांशी संवेदनशीलपणे संवाद साधला तर या महिला अनेक गोष्टी खुलेपणाने सांगतात हा अभ्यास समोर आला. गर्भारावस्थेतील मधुमेहापेक्षाही गर्भारावस्थेतली हिंसेचे प्रमाण अधिक असल्याचे मुंबईतील रुग्णालयांमध्ये केलेल्या अभ्यासातून समोर आले. काही वेळा या महिलांना स्वतःला गर्भधारणा नको होती, असेही दिसले. या काळामध्ये महिलांना समुपदेशन करण्यात आले आणि या समुपदेशनाचा फायदा झाल्याचे निदर्शनास आले. मुंबई महापालिकेशी संबंधित ११ रुग्णालयांमध्ये तसेच राज्यातील इतरही काही वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये हा समुपदेशनाचा उपक्रम गांभीर्याने राबवला जात आहे. सन २०१६-१७ मध्ये हा प्राथमिक अभ्यास झाला होता.

त्या आधी सन २००१ मध्ये मुंबईच्याच भाभा रुग्णालयात घरगुती पातळीवर होणाऱ्या हिंसाचाराचा सामना करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये समुपदेशनाची गरज अधोरेखित करणारा दिलासा हा प्रकल्प राबवण्यात आला होता. हा प्रकल्प यशस्वीपणे राबवल्यानंतर सन २००६ मध्ये तो भाभा रुग्णालयाकडे सोपवण्यात आला. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या अशा हिंसेला बळी पडलेल्या महिलांना सामाजिक आणि मानसिक आधार देण्याचे कार्य दिलासा प्रकल्पाच्या अंतर्गत करण्यात येत आहे. मुंबईतील ११ केंद्रांवर हे कार्य सुरू असून महाराष्ट्राव्यतिरिक्त राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत केरळ, हरियाणा, गोवा, कर्नाटक अशा इतर राज्यांमध्येही अशा पद्धतीची केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

'सेहत'च्या माध्यमातून, हिंसेला बळी पडणाऱ्या महिला आणि मुलींसाठी २४*७ हेल्पलाइनही चालवण्यात येते. क्रमांक - ९०२९०७३१५४.

सन २०१९-२०२० या कालावधीत हिंसाचार प्रकरणी पाच हजारांहून अधिक महिलांना मुंबईतील ११ रुग्णालयांमधून 'सेहत'च्या माध्यमातून मदत करण्यात आली. तर २०२० ते २०२१ या कालावधीत ६ हजार ९०० हून अधिक महिलांना मदत करण्यात असल्याची माहिती 'सेहत'च्या संचालक संगीता रेगे यांनी दिली.